पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८, विद्युत मुख्य कार्यालय,
क्र.विमुका/१ /कावि/११८७/२०२१
दिनांक :- १२ /११ /२०२१

विषय :- महानगरपालिकेच्या रूग्णालयांमधील विद्युत उपकरणे / अग्निशमन उपकरणांची नियमीत तपासणी करणेबाबत...

**परिपत्रक,**

सद्यस्थितीत विविध ठिकाणच्या रूग्णालयामध्ये आगीसंदर्भात घडणा-या दुर्घटनांबद्दल बातम्या आपल्या ऐकण्यात / वाचनात येत आहेत अथवा प्रसिध्दी माध्यमांद्वारे पहावयास मिळत आहेत. अशी दुर्घटना आपल्या शहरातील रूग्णालयांमध्ये अथवा मनपाच्या मिळकतींमध्ये घडू नये याकरिता आवश्यक ती उपाययोजना / पुर्वतयारी करणे आवश्यक असून याकामी सर्व क्षेत्रीय कार्यालयातील कार्यकारी अभियंता (वि) व त्यांचेसमवेत काम करणारा तांत्रिक कर्मचारी वर्ग यांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्राअंतर्गत येणा-या महानगरपालिकेच्या विविध रूग्णालयांमध्ये / इमारतींमध्ये असणारी एकूण विद्युत उपकरणे व त्या उपकरणांची असणारी स्थिती (वापरण्यायोग्य आहे किंवा नाही), तसेच विद्युत वायरींचे काही ठिकाणी असणारे जाळे, वायरींची स्थिती (अर्थिंग तपासणी, स्वीच गिअर, कंट्रोल पॅनल इ.) याबाबत योग्य ती पडताळणी होणे आवश्यक आहे. याकरिता सर्व क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता (वि) यांनी त्यांचे नियंत्रणातील तांत्रीक कर्मचारी यांचे समवेत वेळोवेळी त्यांचे कार्यक्षेत्रातील रूग्णालयांमध्ये समक्ष जाऊन विद्युत उपकरणांची पडताळणी करावी. तसेच वेळोवेळी केलेल्या तपासणीचा अहवाल सह शहर अभियंता (वि) यांचे कार्यालयाकडे Soft व Hard Copy मध्ये सोबतच्या नमुन्यात पाठविणेत यावा.

महानगरपालिकेच्या रूग्णालयांमध्ये आगीबाबत दुर्घटना घडू नये याकरिता यंत्रणा सुस्थितीत असणे गरजेचे आहे. त्याचबरोबर अशा प्रकारची दुर्घटना घडल्यास काय उपाययोजना कराव्यात याबाबत निश्चित Action Plan असणे आवश्यक आहे. तसेच अशा प्रसंगी तातडीने करावयाच्या हालचालींकरिता प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे किंवा नाही याची खातरजमा करून आवश्यकतेनुसार रूग्णालयांमधील अधिकारी / कर्मचारी वर्गास योग्य ते प्रशिक्षणाबाबत उपायोजना कराव्यात. तसेच आवश्यकता असल्यास काही रूग्णालयांमध्ये Mock Drill घेणेत यावे, जेणेकरून रूग्णालयीन कर्मचारी वर्गात याबाबत कोणतीही भिती राहणार नाही.

अनेकदा रूग्णालयीन कर्मचारी वर्गाकडे तातडीच्या वेळी विद्युत कर्मचारी / अभियंत्यांचे संपर्क क्रमांक उपलब्ध नसतात. त्यामुळे आपल्या टीममधील सर्वांचे संपर्क क्रमांक तसेच जवळच्या अग्निशमन केंद्राचा संपर्क क्रमांक व तेथील अधिकारी / कर्मचा-यांचे संपर्क क्रमांक आपले कार्यक्षेत्राचे रूग्णालयांमधील Help Desk कडे देणेत यावेत. जेणेकरून तात्काळ उपाययोजना करणे शक्य होईल.

सबब उपरोक्त बाबींचे काटेकोरपणे पालन करून महानगरपालिकेच्या कोणत्याही रूग्णालयांमध्ये यापुढे कोणतीही आगीबाबत दुर्घटना होणार नाही याची दक्षता संबंधितांनी घ्यावी. विद्युत सुरक्षा व अग्निशमन परिक्षण कामाच्या निविदा प्रक्रीया काही प्रभागांमध्ये अद्यापही चालू असून निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत सर्व कार्यकारी अभियंता (वि) यांनी जबाबदारीने उपरोक्त बाबींची पुर्तता करावी व दुर्घटनेमुळे होणारी हानी टाळावी. यामध्ये कुचराई अथवा टाळाटाळ झाल्याचे निदर्शनास आलेस संबंधितांवर कडक कारवाई करणे भाग पडेल याची कृपया नोंद घ्यावी.

१२/११

(संदेश चव्हाण)
सह शहर अभियंता (वि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

प्रत :- १) सर्व कार्यकारी अभियंता (वि)
२) सर्व उप अभियंता (वि)
३) सर्व कनिष्ठ अभियंता (वि)

(कृ.मा.प.)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
...... क्षेत्रीय कार्यालय, विद्युत
मनपा रूग्णालये / मिळकतींमधील विद्युत उपकरणे तपासणीबाबतचा अहवाल

दिनांक :-

| अ.क्र. | मनपा रूग्णालयाचे / मिळकतीचे नाव | ठिकाण / पत्ता | तपासणी दिनांक | तपासणी अंतर्गत आढळलेल्या त्रुटी | केलेल्या उपाययोजना | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

कार्यकारी अभियंता (वि)
...... क्षेत्रीय कार्यालय